# //प्रेस नोट//

## सन २०२४ -२५ चे सुधारित व सन २०२५-२६ मुळ अंदाजपत्रक

### महापालिका आयुक्त तथा प्रशासक

### श्री. संजय श्रीपतराव काटकर यांचे अर्थसंकल्पाबाबत निवेदन

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आयुक्त तथा प्रशासक म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९५ अन्वये सन २०२४-२५ चा सुधारीत व सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मूळ अर्थसंकल्पासाठी उत्पन्न व खर्चाचे अंदाज सादर करताना मला आनंद होत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये मी हा दुसरा अर्थसंकल्प सादर करत असून या अर्थसंकल्पाद्वारे मिरा भाईंदर शहरातील प्रत्येक नागरिकाच्या सर्वांगिण विकासासाठी महापालिकेच्या माध्यमातून उपलब्ध निधीमधून काहींना काही देता येईल याचा विचार केलेला आहे.

सन २०२४-२५ मध्ये रु. २२९७ कोटी रकमेचा ९४ लक्ष अर्थसंकल्प तयार करण्यात आला होता. त्यामध्ये महसुली उत्पन्न रु.८७८ कोटी २२ लक्ष अपेक्षित केले होते परंतु प्रत्यक्ष वसुली पाहता ते आता रु.८१७ कोटी ७६ लक्ष सुधारीत करण्यात येत आहे. खर्च बाजूस सन २०२४-२५ मध्ये महसुली खर्च रु. ७६३ कोटी ३८ लक्ष अपेक्षित केला होता, तो सुधारीत अंदाजपत्रकात रु. ७५७ कोटी ०२ लक्ष अपेक्षित केला असून भांडवली खर्च रु. ७९६ कोटी २० लक्ष ऐवजी रु.४८८ कोटी ९१ लक्ष सुधारीत करण्यात आला आहे.

## सन २०२५-२६ च्या मूळ अर्थसंकल्पातील प्रमुख उद्दिष्टे:

१. महसुली उत्पन्न वाढविण्यावर भर.

२. खर्चामध्ये बचत.

३. महिला, बालकल्याण व युवा यांच्यासाठी कल्याणकारी योजना.

४. भांडवली कामांतर्गत हाती घेतलेली कामे पुर्ण करण्याचे नियोजन.

५. प्रशासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता व कार्यक्षमता यावर भर.

६. कामांचा दर्जा उत्तम रहावा याकडे विशेष लक्ष.

७. शिक्षण व आरोग्य सुधारणांवर विशेष भर.

८. संगणककीकरणाद्वारे नागरीकांना तात्काळ सुविधा मिळण्यासाठी विशेष प्रयत्न.

# महापालिका उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत:

१) **मालमत्ता कर :**

मालमत्ता कर व फी पासून सन २०२४-२५ मध्ये रु.३५८ कोटी ४३ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले होते. माहे नोंव्हेबर २०२४ अखेरचे प्रत्यक्ष उत्पन्न रु.१८५ कोटी २१ लक्ष विचारात घेवून मालमत्ता करापासून रु.३२३ कोटी २५ लक्ष इतके सुधारीत उत्पन्न अपेक्षित करण्यात येत आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात देखील पहिल्या सहामाही सोबत दुस-या सहामाहीचा कर भरणाऱ्या करदात्यांना पुढीलप्रमाणे सवलत / सूट असणार आहे.

| अ क | कालावधी | दुस-या सहामाहीच्या सामान्य करात सवलत |
|---|---|---|
| १ | दि.०१ एप्रिल २०२५ ते दि. ३० जून २०२५ | ५ % |
| २ | दि.०१ जुलै २०२५ ते दि. ३१ जुलै २०२५ | ३% |

सन २०२५-२६ मध्ये मालमत्ता कर व फी पासून रु.३९८ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित केले आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके वर्षाच्या अगदी सुरुवातीस देण्यात येणार आहेत. जेणेकरुन, महापालिकेस आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस कररुपी उत्पन्न मिळेल.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर वसुली विभागांतर्गत मालमत्ता कराच्या महसुली उत्पन्नात वाढ करण्याकरीता पुढीलप्रमाणे प्रयत्न करण्यात येणार आहेत.

१. वाढीव मागणी व त्यातून वाढणा-या उत्पन्नातील भागिदारी तत्त्वावर मालमत्तांचा जी.आय.एस.सर्व्हे व त्यातून उत्पन्न वाढ.
२. मालमत्ता कराची माहिती ही इतर विभागाच्या माहितीसोबत तुलनात्मक पुर्नपडताळणी करणे (Data Analytics) प्रस्तावित असून यावरुन मालमत्ता कराची माहिती सुधारीत होवुन मालमत्ता कराच्या मागणीमध्ये वाढ होईल.

## २) विकास व तत्सम शुल्क :

सन २०२४-२५ मध्ये शहर विकास विभागाकडुन विकास व तत्सम शुल्कापोटी रु. १.५० कोटी उत्पन्न अपेक्षित केले होते. माहे नोव्हेंबर २०२४ अखेरचे उत्पन्न पाहता ते रु.१५० कोटी पूर्णपणे वसूल होतील असा अंदाज आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.१९५ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित करण्यात आलेले आहे.

## ३) स्थानिक संस्था कर व मुद्रांक शुल्क :

स्थानिक संस्था कर विभागाकडे वस्तू व सेवाकर अनुदानापोटी रु.३०२ कोटी ४० लक्ष ,मुद्रांक शुल्क अधिभारापोटी अनुदान रु.५९ कोटी ४० लक्ष, स्थानिक संस्था कराची मागील वसुली रु.१० कोटी असे एकूण रु. ३७१ कोटी ८० लक्ष रक्कम अपेक्षित करण्यात आले होती. माहे नोव्हेंबर २०२४ अखेर प्रत्यक्षात रु.२३५ कोटी ४१ लक्ष प्रत्यक्षात प्राप्त झालेले असुन उर्वरित चार महिन्यामध्ये उर्वरित रक्कम जमा होईल असा अंदाज आहे.

तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी वस्तू व सेवाकर अनुदानापोटी रु.३२२ कोटी ४८ लक्ष, मुद्रांक शुल्क अधिभारापोटी अनुदान रु.६१ कोटी, स्थानिक संस्था कराची वसुली रु. २५ कोटी असे एकूण रु.४०८ कोटी ४८ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.

## ४) पाणी पुरवठा आकार:

पाणी पुरवठा आकारासाठी सन २०२४-२५ मध्ये रु.१४३ कोटी ८५ लक्ष उत्पन्न अपेक्षित होते, पाणी पुरवठा आकाराचे माहे नोव्हेंबर २०२४ अखेर प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न रु.१०४ कोटी ७१ लक्ष विचारात घेता सुधारित अंदाज रु. १६८ कोटी ५० लक्ष अपेक्षित केले असून सन २०२५-२६ मध्ये रु.२०९ कोटी ९२ लाख उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**५) अग्निशमन दल:-**

अग्निशमन विभागाकडून मूळ अंदाज रु.४४ कोटी १९ लक्ष अपेक्षित केले होते. माहे नोव्हेंबर २०२४ अखेर प्रत्यक्ष रु.१८ कोटी प्राप्त झाले असून रु.५१ कोटी ५७ लक्ष सुधारित अंदाज प्रस्तावित केले आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी रु.५९ कोटी ४८ लक्ष उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**६) स्थावर मालमत्ता विभाग:-**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात स्थावर मालमत्ता विभागाकडून रु.६कोटी १३ लक्ष अपेक्षित केले होते. माहे नोव्हेंबर २०२४ अखेर रु. २ कोटी ११ लक्ष प्रत्यक्षात उत्पन्न प्राप्त झाले असल्याने स्थावर मालमत्ता विभागाचे सुधारित अंदाज रु.५ कोटी ३३ लक्ष अपेक्षित केले आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिकेच्या सर्व मालमत्तांचे नव्याने दर निश्चित करुन तसेच ज्या मालमत्ता भाडेतत्वावर दिलेल्या नाहीत त्या भाड्याने देण्यात येणार असुन त्याद्वारे यावर्षी वाढीव उत्पन्न मिळणार असल्याने सन २०२५-२६ मध्ये स्थावर मालमत्ता विभागाकडून रु. १० कोटी ९० लक्ष उत्पन्न अपेक्षित करण्यात आले आहे.

**७) जाहिरात फी:-**

जाहिरात फी पोटी सन २०२४-२५ मध्ये रु. ३ कोटी १५ लक्ष उत्पन्न अपेक्षित केले होते. माहे नोव्हेंबर २०२४ अखेर प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न रु.२ कोटी ६ लक्ष झाले असल्याने सुधारित अंदाजपत्रकात जाहिरात फी पासून रु.३ कोटी १५ लक्ष उत्पन्न अपेक्षित केले असून सन २०२५-२६ मध्ये रु.६ कोटी उत्पन्न अंदाजित केले आहे

**८) अनुदाने:-**

सन २०२४-२५ मध्ये शासनाकडून माहे नोव्हेंबर २०२४ अखेर रु.३४ कोटी ६१ लक्ष अनुदान प्राप्त झाले असुन उर्वरित कालावधीमध्ये सर्व रकमा प्राप्त होतील असा अंदाज आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी रु.३७८ कोटी ४६ लक्ष अनुदान अपेक्षित धरण्यात आले आहे.

## ९) **कर्ज:-**

आजमितीस महापालिकेचे रु. २२५ कोटी ५९ लक्ष कर्ज शिल्लक आहे. सी.सी. रस्ते बांधणे करीता सन २०२४-२५ साठी रक्कम रु.१०० कोटी कर्ज घेण्याचे प्रयोजन आहे. तसेच सन २०२५-२६ या वर्षासाठी ४०० कोटी कर्ज घेण्याचे प्रस्तावित आहे. तसेच अमृत २.० मधील भुयारी गटार योजनेसाठी रु.३९ कोटी ४२ लक्ष कर्ज घेण्याचे प्रस्तावित आहे.

अशा प्रकारे सन २०२४-२५ मध्ये आरंभीच्या शिल्लकेसह रु.२११६ कोटी ५७ लक्ष इतके सुधारित अंदाज व सन २०२५-२६ मध्ये आरंभीच्या शिल्लकेसह रु.२६९४ कोटी ८९ लक्ष इतके मूळ अंदाज जमा बाजूस अपेक्षित केले आहेत.

# खर्च बाजू

# सन २०२४-२५ मध्ये पूर्ण झालेले प्रकल्प

## बांधकाम / विद्युत विभाग

- **भाईंदर (प.) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गालगत असलेल्या विद्यमान अग्निशमन केंद्र इमारतीच्या जागेत कम्युनिटी हॉल**

  सदर इमारत तळ + ४ मजल्याची असून इमारतीच्या पहिल्या मजल्यावर मल्टीपरपज हॉल, दुसऱ्या मजल्यावर कोचरुम, लायब्ररी, कॅरम, चेस, टेबल टेनिस, जिम, स्टोअर रुम, तिसऱ्या मजल्यावर स्कॅश कोर्ट, बॉक्सिंग कोर्ट, तायक्वांडो तसेच चौथ्या मजल्यावर स्पोर्टस् बार, टर्फ क्रिकेट, टेरेसवर बॅटमिंटन, किचन इ. प्रस्तावित आहे. सदर काम प्रगतीपथावर असून ८०% काम पुर्ण झालेले आहे.

- **भाईंदर (प.) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे समाजमंदिर व कुस्ती आखाड्याचे बांधकाम**

  सदर इमारत तळ + ४ मजल्याची असून तळ मजल्यावर पार्किंग, पहिल्या मजल्यावर आखाडा, व्यायामशाळा, दुसऱ्या मजल्यावर व्यवस्थापक खोली, प्रेक्षक गॅलरी, तिसऱ्या मजल्यावर मुली व मुलांसाठी शयनगृह, स्टोअर रुम, चौथ्या मजल्यावर हॉल प्रस्तावित आहे. सदर आखाड्याच्या इमारतीचे बांधकाम हे मिरा भाईंदर शहरातील कुस्ती प्रेमींकरीता बांधण्यात येत आहे.

- **शासनाच्या मुलभूत सोयी सुविधांसाठी विशेष अनुदान कार्यक्रमांतर्गत कामे**

  - संत ज्ञानेश्वर माऊली वारकरी भवन बांधणे.
  - आरक्षण क्र.२४८ बगीचा या आरक्षित जागेत आवश्यक वापराची इमारत बांधणे (सद्गुरु सदानंद महाराज सभागृह).
  - आरक्षण क्र.२४८ बगीचा या आरक्षित जागेत आवश्यक वापराची इमारत बांधणे (कै. हरिश्चंद्र आमगांवकर जिमनॅस्टीक सेंटर).
  - विहिरींचे शास्त्रोक्त पद्धतीने साफ-सफाई करुन नैसर्गिक व पिण्यायोग्य पाणी निर्माण करणे.
  - मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील डोंगराळ भागामध्ये व आदिवासी पाड्यांकरीता सोलर दिवे बसविणे.

- भाईंदर (पुर्व) नवघर स्मशानभुमी, गोडदेव स्मशानभुमी येथील स्मशानभुमी, रा.म.क्र.०८, काशिमिरा स्मशानभुमींचे अद्यावत विद्युत दाहिन्या बसवुन संपुर्ण सुशोभिकरण करणे.
- घोडबंदर किल्ला संवर्धन करणे.
- प्रभाग क्र.१४ काशिमिरा येथील महानगरपालिकेच्या उद्यानासाठी आरक्षण क्र.३६८ या जागेवर ऑलम्पिक साईज तरण तलाव व आवश्यक सुविधेची इमारत बांधणे.
- प्रभाग क्र.१८ परिसरातील शिवार गार्डन येथील आरक्षण क्र.१६९ (प्रारुप विकास योजना) या भुखंडावर ऑलम्पिक साईज तरण तलाव व आवश्यक सुविधेची इमारत बांधणे.
- मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.२५५ या जागेवर चिल्ड्रन्स ट्राफिक पार्क बांधणे.
- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये फुटबॉल टर्फ उभारणे.
- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दितील सर्व तलावांचे म्युझिकल फाऊंटन बसवुन त्या ठिकाणी सुशोभिकरण करणे.
- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर फुटपाथवर शोभिवंत रेलींग बसविणे.
- फाऊंटन हॉटेल समोरील मेरी टाईम बोर्डाच्या जागेमध्ये प्रवासी जेट्टी जवळ चौपाटी विकसीत करणे.
- वर्सोवा ब्रिज ते घोडबंदर गावाशेजारी खाडी किनारा विकसित करणे
- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील चेना रिव्हर फ्रंट विकसित करणे.
- मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.३०० येथे स्व. प्रमोद महाजन यांचे कलादालन उभारणे.

- **<u>शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विपश्यना केंद्र (सांस्कृतिक भवन) या योजने अंतर्गत घोडबंदर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधणे.</u>**

  घोडबंदर सर्व्हे क्र.२३३ या शासकीय जागेवर शासनाच्या सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागामार्फत सांस्कृतिक भवन, विपश्यना केंद्र व बहुउद्देशीय इमारत बांधण्याचे काम मंजुर करण्यात आले आहे. सदर इमारत तळ + ३ मजल्याची असुन त्यामध्ये विपश्यना सभागृह, मंगल कार्यालय, प्रदर्शन सभागृह, मिनी थिएटर, वाचनालय, कॉन्फरन्स हॉल, इ. सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. सदरचे काम सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात पूर्ण होणार आहे.

- **<u>केंद्र शासनाच्या पी.एम.ई. बस सेवा अंतर्गत मान्यता दिलेली कामे.</u>**

  - घोडबंदर येथे बस आगार विकसित करणे.
  - घोडबंदर बस डेपो येथे केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई. बस सेवा योजनेअंतर्गत HT Connection to LT Connection करणे

## नगररचना विभाग :-

महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील कामे करण्यासाठी भूमी संपादन करणे आवश्यक आहे त्यासाठी सन २०२४-२५ या वर्षामध्ये रु.२५ कोटीची सुधारीत तरतूद करण्यात येत आहे तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.४० कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

**सन २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षातील व २०२५-२६ या अगामी वर्षात करावयाची उल्लेखनिय लोकोपयोगी विकास कामे.**

- **सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेवर आधारित वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था.**
  केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत सदरच्या कामास रु.५१६.७८ कोटीची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार योजनेची कामे प्रगतीपथावर असून जानेवारी २०२५ अखेर कामाची प्रगती ५३% इतकी झालेली आहे. या योजनेतून मिरा भाईंदर शहराची भविष्यातील सन २०५४ पर्यंतची पाण्याची मागणी पुर्ण होवून शहरातील पाणी टंचाई कायम स्वरुपी दूर होणार आहे. सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.१३१ कोटी ३४ लक्ष इतकी तरतूद केलेली आहे.

- **मिरा भाईंदर महानगरपालिका भुयारी गटार योजना टप्पा-२ (भाग-१)**
  सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून उपलब्ध होणाऱ्या २१८ द.ल.ली. पाण्यापासून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अस्तित्वातील भुयारी गटार योजनेचे विस्तारीकरण टप्याटप्याने करणे आवश्यक आहे. याकरीता केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत सदरच्या कामास रु.१७५.१९ कोटीची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जानेवारी-२०२५ अखेर योजनेची प्रगती ६२% इतकी झालेली असुन ५ द.ल.ली. क्षमतेचे सांडपाणी पुर्न:प्रक्रिया केंद्र प्रस्तावित आहे. या केंद्रातील पाणी मिरा भाईंदर शहरातंर्गत बांधकाम, बागबगीचे, रस्ते धुणे, वाहन धुणे इत्यादी करीता वापर करण्यात येईल. सदर योजनेची कामे पूर्ण होताच शहरातील ९५% भागातील रहिवाशांना हि सुविधा प्राप्त होईल. सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.७४ कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

## ➢ मिरा भाईंदर महानगरपालिका भुयारी गटार योजना टप्पा-२ (भाग-२)

केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत सदर कामास रु.६६.८१ कोटीची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. या योजनेत ६.५ द.ल.ली. क्षमतेचे १ मलनि:सारण केंद्र व सुमारे १० कि.मी. लांबीची मलवाहिनी अंथरणे कामाचा समावेश आहे. सदरची अमृत योजनेतील प्रगतीपथावर असलेली व प्रस्तावित भुयारी गटार योजनेची कामे पुर्ण झाल्यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत बहुतांश शहरी भागातील रहिवाशांना भुयारी गटार योजनेचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे शहरातील प्रदुषण कमी होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही. सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.६० कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

## महिला व बालकल्याण विभाग

**सन २०२५-२६ महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध नाविन्यपूर्ण योजना व कार्यक्रम.**

- निराधार/एकल/घटस्फोटीत महिलांच्यामुलींना विवाहाकरीता अर्थसहाय्य देणे.
- निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना शिक्षणाकरीता शैक्षणिक मदत
- मुली व महिलांसाठी कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदत
- वय वर्षे ६० वर्षापर्यंतच्या ज्या महिलेच्या पतीस व विधवा महिलांच्या बाबतीत त्यांच्या वय वर्षे १ ते १८ वर्षापर्यंतच्या मुलांना(पुरुष) कॅन्सर आजाराने ग्रस्त असतील अशा महिलांना आर्थिक मदत
- शहरातील गरीब व गरजू महिला व मुलींकरिता स्वयंरोजगार करणेसाठी हॉस्पीटिलीटी/पॅरामेडिकल इ.विनामुल्य व्यावसायिक / तांत्रिक स्वरुपाचे विनामूल्य विविध प्रशिक्षण महिला भवन, कनकिया, मिरारोड येथे सुरु करण्यात आलेले आहे.
- गरोदर माता व प्रसुती करिता आलेल्या माता मनपा रुग्णालयात दाखल झाल्यास त्यांना मोफत सकस आहार पुरवठा मनपाच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे सुरु आहे.

- **<u>“शासन आपल्या दारी”</u>**:- या अभियाना अंतर्गत कल्याण येथे कार्यक्रम आयोजित करुन नागरिकांना/लाभार्थ्यांना विविध विभागातर्गंत राबविले जाणारी योजनाची माहिती व फॉम वाटप करण्यात आले. तसेच विधवा/एकल महिलांना आर्थिक मदत(माय-माऊली) या योजने अंतर्गत महिला लाभार्थ्यांना मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते धनादेश वाटप करण्यात आले.
- **<u>आंतरराष्ट्रीय योग दिन</u>** :- २१ जून २०२४ रोजी, रामदेव पार्क, बुध्दविहार, विपशन केंद्र, मिरारोड येथे “आंतरराष्ट्रीय योग दिन” साजरा करण्यात आला.
- **<u>“मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण” योजना :-</u>** राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक pभूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात “मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण” योजना सुरु करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सदर योजनेची जनजागृती/अंमलबजावणी शहरामध्ये प्रभावीपणे करणेकरिता आवश्यक ती उपाययोजना करण्यात आल्या होत्या. त्यानुसार विविध अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करुन पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असुन अंदाजित ६५८४८ इतक्या लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे.
- **<u>निराधार /विधवा महिलांना माय- माऊली योजने अंतर्गत प्रती लाभार्थी रु.५००० प्रमाणे आर्थिक मदत देण्यात येत असून अंदाजे ८९६ लाभार्थी या योजनेद्वारे लाभ घेतील असा अंदाज आहे.</u>**
- मुली व महिलांसाठी तसेच पुरुष रुग्णाकरिता कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदत करण्यात येत असून यासाठी रु.७५ लाखांची तरतूद करण्यात आली असून सन २०२४-२५ मध्ये ८७ महिला व ५६ पुरुषांनी याचा लाभ घेतला आहे.
- वरील विविध उपक्रम, योजना महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविले जातात. या सर्व बाबींकरीता सन २०२४-२५ च्या सुधारीत अर्थसंकल्पात रु.६ कोटी ६० लाख व सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.६ कोटी ४५ लाख इतकी तरतूद केलेली आहे.

# शिक्षण विभाग

**सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये केलेले उल्लेखनीय कामगिरी खालीलप्रमाणे :-**

- महापालिकेच्या शाळेमधील ९००० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य (गणवेश, शूज, बॅग, वह्या, पुस्तके इत्यादी) चे वाटप
- **Centre Of Excellence विभाग तयार करण्यात आला असून** या अंतर्गत विद्यार्थी व शिक्षक यांच्या करीता NGO मार्फत विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येत आहेत.
- **१० वी २६८ विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खाजगी शिकवणी व अपेक्षित संचाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.**
- **कला क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये ३००० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.**
- **सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन**
- **बालवाडी मुलांकरीता सकस आहार पुरवठा / शैक्षणिक साहित्य वाटप** –
  महानगरपालिका अंतर्गत असणाऱ्या ३६ बालवाडयांना आठवडयातील सहा दिवस विविध प्रकारचा सकस आहार तसेच शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात येत आहे.
- **संगणक प्रशिक्षण** –
  महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षण देण्यात येत आहे.
- **Smart TV देण्यात आले** –
  महानगरपालिका शाळेतील IDBI बँकेच्या सौज्यन्याने वर्गात Smart TV देण्यात आले आहेत.
- **रोबोटीक प्रशिक्षण तसेच त्याकरीता लागणारे साहित्य वाटप** –
  महानगरपालिकेच्या ३६ शाळांमध्ये सोलार ऑपरेटेड रोबोटिक कोंडिग आर्टिफिशीअल इंटेलिजेंट प्रयोगाशाळा साहित्य पुरवठा करण्यात आलेला आहे. सदर साहित्य हाताळणेकरीता संस्थेमार्फत साहित्य ०६ ऑफलाईन आणि १२ ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

- **<u>बालरंग स्पर्धा-२०२४ करीता मनपा विद्यार्थ्यांची भोपाळ येथे राष्ट्रीय कार्यक्रम याकरीता निवड –</u>**
  राष्ट्रीय बालरंग स्पर्धा २०२४ चे भोपाळ येथे आयोजन करण्यात आलेले होते. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याकरीता काशी मराठी शाळा क्रं.४ मधील ११ विदयार्थ्यांची निवड करण्यात आलेली होती. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या लोकनृत्याचे सादरीकरण करण्यात आलेले होते.

- **<u>लंगडी राष्ट्रीय स्पर्धेकरीता निवड व सहभाग –</u>**
  लंगडी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्यामार्फत लंगडी नॅशनल ज्युनिअर या स्पर्धेकरीता ५ विदयार्थ्यांची निवड करण्यात आलेली होती. तसेच लंगडी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र स्टेट सब-ज्युनिअर स्पर्धेकरीता येथे ०२ विदयार्थ्यांची निवड करण्यात आलेली असुन सदर स्पर्धेमध्ये संघाला व्दितीय क्रमांक मिळालेला आहे.

## दिव्यांग कल्याणकारी / समाज कल्याण योजना :

**समाजविकास विभाग / क्रीडा विभाग मार्फत सन २०२४-२५ मध्ये करण्यात आलेली उल्लेखनीय कामगीरी –**

**समाजविकास विभाग**

- सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात २१५३ दिव्यांगाना पेन्शन योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.
- ८२ दिव्यांग विदयार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे.
- १ दिव्यांगाना लग्नासाठी आर्थिक मदत करण्यात आलेली आहे.
- ३ नविन विरंगुळा केंद्राना मान्यता देण्यात आली.
- महानगरपालिका अंतर्गत विविध कार्यक्रमांना चहा, नाश्ता, पाणी व जेवण पुरवठा करणेकामी निविदा काढण्यात आली (२ वर्षाकरीता
- महिला सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने महिलांकरीता रोजगार मेळाच्याचे आयोजन व रोजगार उपलब्धता केंद्र स्थापन करण्यात आले.

- १३. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय(MoHUA) व्दारे राष्ट्रपती भवन नवी दिल्ली येथे आयोजित व्यवसायिक प्रदर्शनासाठी दोन बचत गटांची निवड

  १) श्री. महालक्ष्मी महिला बचत गट - इमिटेशन ज्वेलरी

  २) ब्राईट रेस महिला बचत बट – वारली पेन्टींग

- पी.एम. स्वनिधी योजने अंतर्गत पथ विक्रेत्यांना कर्ज रक्कम रुपये १०.०००/- मंजुरीसाठी सन २०२३-२४ मध्ये राष्ट्रीय स्तरावर पाचव्या क्रमांक वर निवड

**क्रीडा विभाग**

- महानगरपालिका पुरुष कबड्डी संघ तयार करण्यात आला
- मनपा शाळांतील विदयार्थ्यांकरीता क्रीडा शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली.
- जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.
- ६ क्रीडा खेळाडूंना आर्थिक मदत करण्यात आली.

सन २०२४-२५ च्या सुधारीत अर्थसंकल्पात रु. ९ कोटी ४५ लक्ष व सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.१२ कोटी ८७ लक्ष इतकी तरतूद केलेली आहे.

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

- **दैनंदिन साफसफाई :-**
  मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकुण २४ वॉर्ड असून सार्वजनिक व व्यवसायिक क्षेत्रामध्ये दोन वेळेस झाडलोट, रस्त्यावर पडलेले डेब्रीज, माती, बेवारस फर्निचर, रस्ते दुभाजक पडलेले माती काढून उचलून घेणेची कामे खाजगीकरणामार्फत करण्यात येत असून त्याकरीता सन २०२४-२५ च्या सुधारीत अर्थसंकल्पात रु.१७० कोटी व सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.१७० कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

- **नालेसफाई :-**
  मिरा भाईंदर महानगरपालिकेमधील कच्चे व पक्के नाले सफाईची कामे पावसाळ्यापुर्वी पुर्ण करणेकामी सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.४ कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

- **पावसाळ्यातील पाणी तुंबणाऱ्या जागेसाठी नियोजन :-**
  महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान तसेच समुद्राच्या भरतीच्या वेळी पावसाचे पाणी रहिवासी, बैठी घरे, झोपडपट्टी आदी परिसरात साचून राहणारे पाण्याचा तातडीने उपसा करण्यासाठी सक्शन पंप भाड्याने घेऊन पाण्याचा उपसा करण्याची कामे करण्यासाठी सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.८० लक्ष इतकी तरतूद केलेली आहे.

- **स्वच्छ भारत अभियानाकरीता** सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.१ कोटी इतकी तरतूद केलेली आहे.

- **प्रस्तावित कामे** :-
  "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतूद " या योजनेअंतर्गत ०३ नग ओला कचरा प्रक्रिया फिरते वाहन खरेदी व स्वयंचलित डस्टबिन खरेदी करणेकामी शासनाने मान्यता दिलेली आहे.

## परिवहन सेवा

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन pउपक्रमासाठी महापालिका निधीमधून रक्कम रु.३५ कोटी ची तरतूद सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे.

## उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग

### सन २०२४-२५ मधील उल्लेखनीय कामे

- माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये अमृत गटामध्ये विभागीय स्तरावर कोकण विभागातून मिरा भाईंदर महानगरपालिकेस रु.१.५० कोटी बक्षिस रक्कम मिळाली आहे.
- झाडांच्या फांदया व पालापाचोळा यापासून लाकडी ठोकळे (wood bricks) तयार करण्याचा प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आला.
- शहरात झाडे दत्तक योजनेची सुरवात मा. आयुक्त सो यांच्या संकल्पनेतून सुरवात करून शहरामध्ये स्थानिक लोकप्रतीनीधी / महानगरपालिकेतील कंत्राटदार / विकासक / पर्यावरणप्रेमी / NGO / अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत झाडे दत्तक योजने अंतर्गत स्वखर्चातून २६६१ नग झाडे लावून निगा देखभाल करण्यात येत आहे.
- शहरामधील मिरारोड स्मशानभुमी, चेना स्मशानभुमी, काजुपाडा स्मशानभुमी येथे मे. आर्क फाऊंडेशन यांच्यामार्फत झाडे दत्तक योजने अंतर्गत सोनचाफा या सुंगधी फुलांची झाडे स्वखर्चातून लागवड करुन निगा व देखभाल करण्यात येत आहे.
- मिरारोड स्टेशन येथे NCAP निधी मधून पाण्याचे कारंजे तयार करण्यात आले आहे.
- उद्याने व मैदाने यांची आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने निगा वा देखभाल करणेकामी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली आहे.
- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनीयम १९७५ अन्वये दर ०५ वर्षांनी वृक्षगणना करणेकामी ठेकेदाराची नेमणूक करून काम सुरु आहे.
- घोडबंदर किल्ला येथे सुशोभीकरण करण्यात आलेले आहे.
- वन महोत्सव आयोजित करणे प्रस्तावित आहे.
- रस्त्याच्या दुतर्फा झाडांची शास्त्रीय पद्धतीने छाटणी करणेकामी कर्मचाऱ्यांना वृक्षसंगोपन तज्ञ (Arborist) यांच्यामार्फत वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.
- शहराला ओळख निर्माण होण्यासाठी मुख्य रस्ते, मध्यम रस्ते व अंतर्गत रस्ते मधील दुभाजकामध्ये एकसमान थिम करून शोभिवंत झाडांची लागवड करणे.

**सन २०२५-२६ मधील प्रस्तावित कामे.**

- माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेतून शहरात भारतीय प्रजातीची ८,५०० हजार वृक्षारोपण व ६,५०० हजार बांबू रोपांची लागवड करण्यात येणार आहे.
- हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता मिरारोड स्टेशन ते सृष्टी सिग्नल दुभाजक येथे NCAP निधी मधुन शोभिवंत झाडे लावुन दुभाजक सुशोभिकरण करणे.
- हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता सिल्वर पार्क ते सृष्टी सिग्नल दुभाजक येथे NCAP निधी मधुन शोभिवंत झाडे लावुन दुभाजक सुशोभिकरण करणे.
- हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता भाईंदर (पुर्व) इंद्रलोक येथील महानगरपालिका शाळा क्र. ०८ येथे NCAP निधी मधुन लॉन व शोभिवंत झाडे लावुन सुशोभिकरण करणे.
- हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता स्व. आनंद दिघे मैदान, भाईंदर (पुर्व) येथे NCAP निधी मधुन लॉन व शोभिवंत झाडे लावुन सुशोभिकरण करणे.
- हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता आरक्षण क्र. २४६ मैदान मिरारोड (पुर्व) येथे NCAP निधी मधुन लॉन व शोभिवंत झाडे लावुन सुशोभिकरण करणे.
- हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व स्मशानभुमी येथे NCAP निधी मधुन लॉन व शोभिवंत झाडे लावुन सुशोभिकरण करणे.
- हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता आरक्षण क्र. १३५ उद्यान येथे NCAP निधी मधुन लॉन व शोभिवंत झाडे लावुन सुशोभिकरण करणे.
- हवेची गुणवत्ता सुधारण्याकरीता भाईंदर (प.), १५० फुट लिंक रोड दुभाजक येथे NCAP निधी मधुन शोभिवंत झाडे लावुन दुभाजक सुशोभिकरण करणे.
- वन महोत्सव आयोजित करणे.
- शहरामधील विविध उद्यान आरक्षित आरक्षणे विकसीत करणे.

सन २०२४-२५ च्या सुधारीत अर्थसंकल्पात रु. ५८ कोटी २६ लक्ष व सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.५४ कोटी ३७ लक्ष इतकी तरतूद केलेली आहे.

# वैद्यकीय आरोग्य विभाग

## सन २०२४-२५ मध्ये आरोग्य सेवा बळकटीकरणासाठी केलेली कामे

- भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात माफक दरात (CGHS) Krasnaa लॅबोरेटरीज द्वारे PPP तत्वावर अद्यावत प्रयोगशाळा व रेडीऑलॉजी संबंधीत सुविधा, जसे की MRI, CT scan, X-Ray, सोनोग्राफी इ. सेवा रुग्णांसाठी सुरु करण्यात आल्या आहेत.
- गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाटयगृहाशेजारी १०० खाटांचे मातोश्री इंदिराबाई बाबूराव सरनाईक मल्टीस्पेशालिटी रुग्णालय हे Platinum Hospitals सोबत PPP तत्वावर महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत कार्यान्वीत करण्यात आले आहे.
- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत कार्यक्षेत्रात ४ नवीन आरोग्य वर्धीनी केंद्र (UHWC) कार्यान्वीत करण्यात आली आहेत.

## सन २०२५-२६ मध्ये आरोग्य सेवा बळकटीकरणासाठी प्रस्तावित कामे

- भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील तळ मजल्यावर CSR द्वारे ७ डायलिसीस मशीन प्राप्त झाले असून सदर ठिकाणी डायलिसीस सेंटर सुरू करण्यात येणार आहे.
- भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात तिसऱ्या व चौथ्या मजल्यावर अतिरीक्त ५० खाटा व १२ खाटांचे नवजात आजारी बालकांसाठी SNCU (Special Newborn Care Unit) कार्यान्वीत करण्यात येणार आहे.
- आरक्षण क्र.२१० व २११ या ठिकाणी १०० खाटांचे अद्यावत कर्करोग उपचार रुग्णालय उभारणीचे काम सुरू असून AERB या शासकीय संस्थेच्या आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्या आहेत.
- आरक्षण क्र.३०२ या ठिकाणी ३०० ते ५०० खाटांच्या अद्यावत रुगणालयाच्या उभारणी सदंर्भात कार्यवाही सुरु आहे.

  NUHM अंतर्गत १३ नवीन UAAM (नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर) उभारणीकरीता आवश्यक पोटा केबीन खरेदीची प्रक्रिया प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच ६ UAAM R & R (Repair and Renovation) and ३ HBT R & R (Repair and Renovation) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधा बळकटीकरणाकरीता Center of Excellence स्थापन करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.
- महानगर गॅस या ंच्याकडून सीएसआर फंडातून साधारण प्रत्येकी रु.१४ लाख किंमतीच्या दोन मशिन मिरा भाईंदर महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत. सदर मशीनद्वारे क्षयरोगाचा Primary व Drug Resistant TB चा अहवाल साधारण एक तासाच्या आत मोफत मिळणार आहे.
- सर्व सर्व बाबींकरीता सन २०२४-२५ च्या सुधारीत अर्थसंकल्पात रु.६८ कोटी ५५ लक्ष व सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.८० कोटी ९१ लक्ष इतकी तरतूद केलेली आहे.

## पर्यावरण विभाग

### सन २०२४-२५ मधील उल्लेखनीय कामे

- पर्यावरण विषयक जनजागृती करणेकामी IEC वाहनाव्दारे मिशन लाईफ (Mission LiFE) अंतर्गत पर्यावरण विषयक जनजागृती करण्यात येत आहे.
- पर्यावरणपूरक उत्सव साजरे करणेकामी जनजागृती करणे.
- पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणे.

### सन २०२५-२६ मधील प्रस्तावित कामे

- मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध उपक्रमांमधुन निर्माण होणारे कार्बन क्रेडिटचे मूल्यमापन करुन आर्थिक उत्पन्न प्राप्त करुन घेणेकरिता सल्लागार नियुक्त करणे.
- पर्यावरण विषयक जनजागृती करणेकामी IEC वाहनाव्दारे मिशन लाईफ (Mission LiFE) अंतर्गत पर्यावरण विषयक जनजागृती करणे.
- पर्यावरणपूरक उत्सव साजरे करणेकामी जनजागृती करणे.
- पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणे.
- हवा प्रदूषण नियंत्रण व हवेची गुणवत्ता सुधारणेकामी विविध उपाययोजना व निर्देश अंमलबजावणीकरीता विविध विभागांशी समन्वय साधणे.

# संगणक विभाग

- **शासकीय कार्यक्षमता आणि संवाद सुधारण्यासाठी ई-ऑफिस प्रणालीचा वापर**

महाराष्ट्र राज्य नेहमीच प्रशासकीय सुधारणा आणि नव्या तंत्रज्ञानाच्या स्विकृती व वापराच्या बाबतीत इतर राज्यांपेक्षा अग्रेसर राहिले आहे. ई-ऑफिस प्रणालीच्या वापरामुळे विभागांमधील दस्तऐवजांचे आदानप्रदान जलद आणि सुरक्षित पद्धतीने करता येते. तसेच ई-ऑफिसच्या वापरामुळे सर्व दस्तऐवज डिजिटल स्वरूपात उपलब्ध असल्यामुळे प्रत्येक यंत्रणेकडून त्यांच्या क्षेत्रातील स्थितीची अद्ययावत माहिती त्वरित वरिष्ठ स्तरावर पोहचविता येऊ शकेल. कागद-आधारित कार्यपध्दतीच्या मर्यादा आहेत. हरवलेल्या दस्तऐवजांची, दस्तऐवज शोधण्यासाठी होणारा कालापव्यय आणि अनपेक्षित घटनाची असलेली असुरक्षिता यामुळे शासकीय कामकाजात संगणकाचा अधिकाअधिक वापर करून शासकीय कामकाज गतिमान व्हावे, कामकाजात सुसुत्रता व्हावे, दस्ताऐवज व माहिती सुरक्षित, त्वरेने व जलद गतीने प्राप्त होऊन निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी ई- ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर करणेचे शासन निर्देश होते त्या नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आयुक्त पदाचा दि 9/8/2023 रोजी पदभार घेतल्यानंतर सर्व प्रथम दि.०२/१०/२०२३ रोजी देशाच्या स्वातंत्र्य दिनी महापालिकेत ई-ऑफिस प्रणाली अंमलबजावणी करणेचा निर्णय घेतला व त्यासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती, अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण दिलेले आहे. ई-ऑफिस मनपाच्या सर्व विभागात सुरु करण्यात आलेला असून ई-ऑफिस प्रणाली स्विकारुन दीड वर्ष पूर्ण झालेले आहे.

तसेच सदरकामी प्रशासकीय ठराव क्र.२१०अन्वये NIC मार्फत तांत्रिक मनुष्यबळ पूरवठा करणेकामी मंजूरी घेवून महानगरपालिकेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना ई- ऑफिस चे नियमित प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने ई- ऑफिस प्रणालीची अमलबजावणी केल्याबाबत केंद्र शासनाच्या National Information Center(NIC) विभागाचे प्रशस्ती पत्र प्राप्त झालेले आहे. महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण ३५२६ पत्राची ई-ऑफिस प्रणालीमध्ये नोंद घेण्यात आलेली असून ३२८४ पत्रावर कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

सन २०२४-२५ च्या सुधारीत अर्थसंकल्पात रु.१५ कोटी ५७ लक्ष व सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु. २३ कोटी ९० लक्ष इतकी तरतूद केलेली आहे.

- **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश अंतर्गत नागरिकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करणे.**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 दि. 28.04.2015 रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील कलम-3 मध्ये नमुद करण्यात आल्यानुसार या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती या नागरी संस्थामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा नागरी केंद्रबिंदू मानून, नागरिकांना दैनदिन जीवनामध्ये आवश्यक असलेल्या एकुण 57 सेवांचा समावेश लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 मध्ये करणेबाबत व सदर सेवांकरीता आबश्यक कागदपत्रे, शुल्क, नियत कालमर्यादा, पद निर्देशित अधिकारी तसेच प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी इत्यादी बाबी सर्व महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायती यांनी अधिसूचित करणेबाबत शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने महाराष्ट्र लोकसेवा अध्यादेश अंतर्गत एकूण 62 सेवा अधिसुचित करण्यात आलेल्या असून 3 सेवा अधिसूचित करणेकरीता पाठविण्यात आलेला आहेत. 50 सेवा ऑनलाइन द्वारे नागरिकांना उपलब्ध आहेत. सदर सेवा शासनाच्या आपले सरकार पोर्टल सोबत इंटिग्रेशन केलेल्या करण्यात आलेला आहेत.

सन 2025- 26 या आर्थिक वर्षात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश अंतर्गत नव्याने अधिसूचित करण्यात आलेल्या 20 सेवा तसेच सार्वजनिक बांधकाम १० सेवा व पाणी पुरवठा ११ सेवा विकसित करून नागरिकांना एकूण ९१ सेवा ऑनलाईन द्यारे उपलब्ध करण्यात येतील. सण 2024-25 या आर्थिक वर्षात माहे जानेवारी 31 पर्यंत RTS अंतर्गत एकूण ७०५४ अर्ज प्राप्त झालेले असून ३५१८ अर्जवर कार्यवाही करण्यात आलेली आहे .

# नाविन्यपूर्ण कामे

**१. ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित करणे:**

100% डिजिटायझेशन करून प्रशासकीय प्रक्रियांना गती व पारदर्शकता प्रदान करण्यात आली आहे.

**२. एमबीएमसी कर्मचारी @ वन क्लिक**

स्वयंचलित उपस्थिती (हजेरी) प्रणाली लागू करून वेळेवर हजेरी व जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

**३. वेळेवर मजुरी देयके :**

मजुरांना वेळेवर वेतन देऊन कामगार कल्याण व कार्यक्षमता वाढविण्यास प्राधान्य.

**४. एमबीएमसी टेंडर @ 2026**

देखभाल टेंडरचे सखोल पुनरावलोकन करून दोन वर्षांसाठी कार्यादेश निश्चित केले, त्यामुळे महापालिकेच्या मालमत्तेची देखभाल सुधारली.

**५. एसडब्ल्यूएम वाहन व कामगार व्यवस्थापन नियंत्रण:**

घनकचरा व्यवस्थापन (SWM) वाहन व कामगार यांचे व्यवस्थापन सुधारले.

**६. एमबीएमसी देखभाल @ कमी खर्चात**

खर्च कपात साध्य केली:

- **42% बचत - पंपिंग स्टेशन, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) आणि गटार देखभाल**
- **40% बचत - कच्च्या नाल्यांची स्वच्छता**

**७. ई-टेंडर @ एमबीएमसी**

सर्व महापालिकेच्या कामांची पारदर्शक निविदा प्रणालीद्वारे अंमलबजावणी, केंद्र सरकार व केंद्रीय दक्षता आयोग (CVC) मार्गदर्शक तत्त्वांचे पालन.

**८.रविवार गार्डन उपक्रम:**

रविवारी उद्यानांसाठी विशेष उपक्रम राबवून सामुदायिक सहभाग व पर्यावरण संवर्धनास प्रोत्साहन.

9. **हिरव्या कचऱ्यातून उत्पन्न:**

झाडे तोडल्यावर उरलेल्या लाकडाचा पुनर्वापर करून पर्यावरणपूरक उपक्रम राबवला.

10. **जनतेच्या सहकार्याने स्वच्छता मोहिम:**

महानगरपालिका आणि नागरिक यांचा एकत्रित सहभाग असलेली मोठ्या प्रमाणावर यशस्वी स्वच्छता मोहिम राबवली.

11. **मीरा-भाईंदर @ 2047 परिषद:**

शहराच्या दीर्घकालीन विकासासाठी धोरणात्मक नियोजन करण्यासाठी परिषद सुरू केली.

12. **नव-उपक्रम @ एमबीएमसी**

महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी नव-उपक्रम कक्ष स्थापन केला, जो विभागांना तांत्रिक व कौशल्य आधारित मदत पुरवतो.

13. **ऊर्जाबचत @ रात्र:**

ऊर्जाबचतीसाठी एलईडी स्ट्रीटलाइट्स बसवून सुरक्षितता व वीज बचत सुनिश्चित केली.

14. **डिजिटल कचरा व्यवस्थापन @ एमबीएमसी**

घनकचरा व्यवस्थापनासाठी (SWM) अद्ययावत तंत्रज्ञान व रिअल-टाइम मॉनिटरींग प्रणाली लागू केली.

15. **विद्यार्थ्यांसोबत मध्याह्न भोजन निरीक्षण**

शाळांमधील मध्याह्न भोजनाचे नियमित निरीक्षण करून अन्न सुरक्षा, पोषण गुणवत्ता व स्वच्छता सुनिश्चित केली.

16. **शिक्षणासाठी एमबीएमसी उत्कृष्टता केंद्र**

मिरा-भाईंदर @ 2047 व्हिजन अंतर्गत शहराचे प्राथमिक शिक्षण केंद्र म्हणून रुपांतर करण्याच्या उद्देशाने केंद्र स्थापन केले.

17. **सीएसआर परिषद @ 2047:**

सामाजिक विकासासाठी सहकार्य वाढवण्यासाठी सीएसआर परिषद भरवली.

18. **एमबीएमसीसाठी स्वयंसेवी संस्था (NGO) सहकार्य**

समाजोपयोगी कार्यासाठी स्वयंसेवी संस्थांसोबत भागीदारी प्रस्थापित केली.

19. **सेवा हक्क कायदा (RTS) कार्यान्वित**

नागरिकांना वेळेत शासकीय सेवा मिळाव्यात यासाठी सेवा हक्क कायदा प्रभावीपणे लागू केला.

20. **होम @ 20**

वाहतूक गतीशीलता सुधारण्यासाठी वाहतूक नियोजन सुरू केले, 20 मिनिटांत शहराच्या कोणत्याही ठिकाणी पोहोचण्याचे लक्ष्य.

21. **सीसी रस्ते: सुरक्षितता उपाय**

सार्वजनिक सुरक्षेसाठी सिमेंट-कॉंक्रिट रस्त्यांवर विशेष सुरक्षा उपाय लागू केले.

## 22. कॅम्पस प्लेसमेंट @ एमबीएमसी

"Employability@१८" उपक्रमाअंतर्गत नामांकित कंपन्यांमध्ये रोजगार व प्रशिक्षण संधी उपलब्ध करून दिल्या.
ही योजना मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेशी संलग्न असून स्थानिक स्वराज्य संस्थेचा एक अभिनव उपक्रम आहे.

## 23. दक्ष एमबीएमसी

उद्यान, नाले, आणि रस्ते सुरक्षेवर विशेष दक्षता विभाग स्थापन केला, त्यामुळे शहरातील गुन्हेगारी व तक्रारींची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली.

## 24. हवामान कृती आराखडा

पर्यावरणीय आव्हाने सोडवण्यासाठी आणि शाश्वत विकासासाठी हवामान कृती आराखडा तयार केला व अंमलात आणला.

## 25. पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापन

- नारळ कचऱ्याच्या पुनर्वापरासाठी कोकोपीट प्रक्रिया प्रकल्प सुरू केला.
- हॉटेल व कोंबडी विक्रेत्यांच्या कचऱ्यासाठी एकात्मिक व्यवस्थापन प्रणाली विकसित केली.

## 26. रोजगार योग्यता @ 18

18 वर्षांपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याला व्यवसाय प्रशिक्षण व औद्योगिक कौशल्य देऊन सक्षम करण्यासाठी एमबीएमसीचा महत्त्वाचा उपक्रम.
राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी संलग्न हा उपक्रम युवा पिढीला कौशल्याधारित अर्थव्यवस्थेसाठी तयार करतो.

## 27. नोकरी बाजारातील पहिले पाऊल - प्रशिक्षण शिबीर

"Employability@१८" उपक्रमाचा भाग म्हणून **व्यावसायिक कौशल्य आणि प्रत्यक्ष अनुभव देणारे बूटकँप शिबिर सुरू केले**, जे शिक्षण ते रोजगाराच्या प्रवासासाठी उपयुक्त आहे.

**आभार :**

मिरा भाईंदर शहरास केंद्र शासनाने जे योगदान दिले त्याबद्दल केंद्र शासनाचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री व दोन्ही मा. उपमुख्यमंत्री यांनी मिरा भाईंदर शहराच्या विकासाला वेळोवेळी प्राधान्य देवून निधी उपलब्धतेसोबत इतर अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाpppठी पुढाकार घेऊन मोलाची भूमिका बजावली आहे. त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करीत आहे.

ठाणे जिल्ह्याचे मा. पालकमंत्री, मा. परिवहन मंत्री, मिरा भाईंदर क्षेत्रातील मा. खासदार, मा. आमदार, मा. मुख्य सचिव, मा. आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नगर विकास विभागाचे मा. प्रधान सचिव (१) व (२), पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मा. प्रधान सचिव व शासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सर्व माजी सन्माननीय पदाधिकारी व सन्माननीय माजी लोकप्रतिनीधी यांची महानगरपालिकेच्या सुनियोजित विकासासाठी भुमिका नेहमीच सकारात्मक राहीली आहे, त्यांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

मिरा भाईंदर शहरातील सर्व वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांचे पत्रकार, प्रतिनीधी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

महापालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच कर्मचारी संघटना यांचे आभार व्यक्त करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**संजय श्रीपतराव काटकर, भाप्रसे**
**प्रशासक तथा महापालिका आयुक्त**